# प्रेस नोट दिनांक १३/०३/२०२४

महिलांनी स्वत:च्या हक्कासाठी दिलेल्या लढयाच्या स्मरणार्थ दरवर्षी ०८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणुन साजरा केला जातो. याचे औचित्य साधुन सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाचे वतीने दिनांक १२/०३/२०२४ रोजी पोलीस कल्याण केंद्र,सोलापूर येथे जागतीक महिला दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन पोलीस आयुक्त मा.श्री एम.राजकुमार हे उपस्थीत होते. तसेच सदर कार्यक्रमासाठी मा.पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) श्री अजित बोऱ्हाडे,पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) मा.श्रीमती डॉ.दिपाली काळे तसेच सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) मा.श्रीमती प्रांजली सोनवणे असे हजर होते. तसेच सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन श्रीमती वासंती येळेगांवकर (आर्थिक सल्लागार) व श्रीमती सोनल पांचाळ या हजर होत्या. सदर कार्यक्रमांत अंशकालीन महिला कर्मचारी यांना साडी वाटप करण्यात आले व पोलीस आयुक्तालयातील उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले. त्यामध्ये दामिनी पथक,महिला सुरक्षा विशेष कक्ष,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,एमआयडीसी,फौजदार चावडी व विजापूर नाका पोलीस स्टेशनकडील मुस्कान पथक,सायबर पोलीस ठाणे,पोलीस मुख्यालय हॉस्पिटल कडील महिला स्टाफ त्याचप्रमाणे मा.सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे),वपोनि.अश्वीनी भोसले,सहा.पोलीस निरीक्षक,रईसा शेख, पोलीस उप निरीक्षक संजीवनी व्हट्टे यांचा सन्मान करण्यात आला.

सदर कार्यक्राची प्रस्तावना पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) मा.डॉ.दिपाली काळे यांनी केली. त्यात त्यांनी महिला दिन ८ मार्च रोजी साजरा करण्यात येतो. पोलीस आयुक्तालयातील महिला अधिकारी व अंमलदार या विविध ठिकाणी महिला दिनाच्या कार्यक्रमाकरीता उपस्थित राहिले आहेत. मा.पोलीस आयुक्त यांनी महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी महिला दिनाचे आयोजन करावे असे प्रस्तावित केले असता सदरचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला असल्याचे सांगितले. महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक मा.रश्मी शुक्ला मॅडम असुन ही महिलांसाठी अभिमानची बाब आहे. तरी सर्व महिलांनी प्रेरित होवुन काम करावे असे अवाहन केले. तसेच उपस्थित महिला अंमलदार यांना जबाबदारीने काम करावे असे अहवान केले.

तसेच सदर कार्यक्रमात मा.पोलीस आयुक्त,सोलापूर शहर यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांना पोलीस गणवेषाची प्रतिष्ठा राखणे बाबत व दुचाकी वाहनावरुन जाताना सुरक्षिततेच्या दृष्टीने हेल्मेटचा वापर करणे बाबत अवाहन केले. तसेच त्यांनी उपस्थीत महिलांना स्त्री-पुरुष समानता याबाबत मार्गदर्शन केले. सर्व महिलांनी काम करताना तसेच त्यांचे खाजगी जिवनात स्त्री पुरुष समानाता जोपासले पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांनी स्वत:साठी वेळ दिला पाहिजे असे मार्गदर्शन केले.

तसेच प्रमुख पाहुणे श्रीमती येळेगांवकर यांनी महिलांनी आर्थिक गुंतवणुक कशी करावी या विषयावर व श्रीमती सोनल पांचाळ यांनी त्वचेची काळजी कशी घ्यावी या विषयावर मार्गदर्शन केले.

सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी कार्यक्रम संपल्याचे जाहीर करुन उपस्थितांचे आभार मानले.

**(स्वाती येळे)**
सहायक पोलीस निरीक्षक
महिला सुरक्षा विशेष कक्ष,
सोलापूर शहर.

Scanned with OKEN Scanner